माहितीचा अधिकार

**राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ अमरावती**
**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १८ (१) अन्वये**
**प्राप्त झालेली तक्रार**
**तक्रार क्रमांक : ३९/२०१९, ४०/२०१९ व ४१/२०१९**

**तक्रारकर्ता, श्री.दत्तराव साहेबराव जाधव,**
**मु.पो.शिरपुर जैन, ता.मालेगांव, जि.वाशिम**

**विरुध्द**

**जन माहिती अधिकारी शिक्षणाधिकारी (माध्य.) यांचे कार्यालय,**
**जिल्हा परिषद, वाशिम, ता.जि.वाशिम**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्य.),**
**जिल्हा परिषद, वाशिम, ता.जि.वाशिम**

**तक्रार अर्जावरील सुनावणी दिनांक : २२.०८.२०२४**

| | | |
|---|---|---|
| **तक्रारकर्ता** | **:** | **अनुपस्थित** |
| **जन माहिती अधिकारी** | **:** | **उपस्थित** |
| **प्रथम अपिलीय अधिकारी** | **:** | **उपस्थित** |

प्रस्तुत प्रकरणी यापुर्वी दि.२९.०८.२०२३ व त्यांनतर दि.१८.०१.२०१४ रोजी सुनावणी घेवून खालील प्रमाणे अंतरिम आदेश पारित करण्यात आले होते.

" प्रस्तुत प्रकरणातील उपलब्ध कागदपत्रे व तक्रारकर्ता यांनी केलेल्या युक्तीवादावरुन असे निदर्शनास येते की, प्रस्तुत प्रकरणी यापुर्वी दि.२९.०८.२०२३ रोजी पारित केलेल्या सविस्तर अंतरिम आदेशाचे व दि.१६.०८.२०१८ रोजी पारित केलेल्या द्वितीय अपील आदेशाचे अनुपालन जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी यांनी केले नसून दि.०१.१२.२०१५ रोजीच्या शासन परिपत्रक तसेच आयोगाचे द्वितीय अपील क्र. ४२२९/२०१४, १३६९/२०१५, व १३६८/२०१५ या तिनही प्रकरणातील पारित आदेशाचे अनुपालन केले नसल्याने प्रस्तुत प्रकरणात संबंधिताविरुध्द रु.२५,०००/- इतकी शास्तीची कार्यवाही करण्यात यावी. तसेच माहिती अधिकार अधिनियमाचे कलम २० (२) अन्वये शिस्तभंगाच्या कार्यवाहीची शिफारस करण्यात यावी व नुकसान भरपाई देण्यात यावी, अशी आग्रही विनंती श्री.जाधव यांनी केली आहे. तसेच दि.१६.०८.२०१८ रोजी पारित केलेल्या आदेशाचे अनुपालन करुन सदर अहवाल आयोगास सादर करण्याबाबत निर्देशीत करण्यात आले होते व माहिती संबंधित केलेल्या कार्यवाहीबाबतची सर्व नस्ती देखील उपलब्ध करुन द्याव्या, असे देखील कळविण्यात आले होते. याशिवाय मा.सर्वोच्च न्यायालयामधील मुळ याचिका (सिव्हील) क्र.९९०/२०२१, यात दि.१७, ऑगष्ट २०२३ चे आदेश तसेच सामान्य प्रशासन विभाग,

परिपत्रक क्र.रामाआ.२०१९/प्र.क्र.१८/सहा, दिनांक १६.०२.२०२३ व मा.मुख्य माहिती आयुक्त यांनी नुकतेच कलम २५(५) अन्वये दिलेल्या कलम ४ (१) च्या अनुपालनाचे दिशानिर्देश इत्यादी बाबी लक्षात घेता, अपिलार्थी यांचे तीनही प्रकरणात पारित केलेले आदेश तसेच दि.२९.०८.२०२३ रोजी पारित केलेल्या अंतरिम आदेशाचे अनुपालन झाले नसून जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी हे मागील सुनावणीस हजर नव्हते तसेच आजच्या सुनावणीस देखील कुठल्याही पुर्वसूचनेशिवाय गैरहजर असून महाराष्ट्र शासनाचे सामान्य प्रशासन विभागाने शासन परिपत्रक क्र.संकिर्ण २०१५/प्र.क्र.(२२२/१५) सहा. दि.०१.१२.२०१५ रोजीच्या शासन परिपत्रकाचे उल्लंघन आहे व आयोगाने पारित केलेल्या मुळ आदेशाचे देखील अवहेलना केली असल्याचे आढळून येते. ही वस्तुस्थिती लक्षात घेता, मुळ आदेशातील शास्तीची रक्कम ही का वाढवून देण्यात येवू नये ? तसेच कलम १९ (८) (ख) अन्वये अपिलार्थीस झालेल्या शारिरीक, मानसिक त्रासाबद्दल नूकसान भरपाईची रक्कम का देण्यात येवू नये ? व ती संबंधित जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी यांचे वेतनातून का वसूल करण्यात येवू नये ? याबाबतचा स्वयंस्पष्ट लेखी खुलासा पुढील सुनावणीस व्यक्तीश: उपस्थित राहून सादर करावा. असे करित असतांना दि.१६.०८.२०१८ रोजीचा मुळ आदेश व तक्रार क्र. ३९/२०१९, ४०/२०१९ व ४१/२०१९ यात दि.२९.०८.२०२३ रोजी पारित केलेल्या अंतरिम आदेशाचा अहवाल देखील आयोगास सादर करावा.

**उपरोक्त आदेशाच्या अधिन राहून जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी यांनी स्वयंस्पष्ट लेखी खुलासा व अनुपालन अहवाल पुढील सुनावणी दि.२९.०४.२०२४ रोजी व्यक्तीश: उपस्थित राहून सादर करावा.**"

वरील पारित अंतरिम आदेशाचे अनुपालनासाठी आज दिनांक २२.०८.२०२४ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. त्यानुसार आज रोजी सुनावणी दरम्यान तक्रारकर्ता अनुपस्थित आहेत. विद्यमान जन माहिती अधिकारी श्री.आकाश अहाळे व तत्कालीन जन माहिती अधिकारी श्री.दिनेश तरोळे हे उपस्थित आहेत.

प्रस्तुत प्रकरणातील उपलब्ध कागदपत्रे व जन माहिती अधिकारी यांचे खुलाश्यावरुन असे निदर्शनास येते की, तक्रारकर्ता श्री.दत्तराव जाधव यांनी दि.१६.०८.२०१८ रोजी पारित केलेल्या आदेशानूसार कार्यवाही न झाल्याने तक्रार दाखल केलेली आहे. प्रस्तुत प्रकरणी तत्कालीन जन माहिती अधिकारी यांनी मागितलेली माहिती विनामुल्य देणे तसेच रु.५०००/- इतकी शास्ती व कलम १९ (८)(ख) अन्वये रु.१०००/- इतकी नूकसान भरपाई तसेच तत्कालीन अपिलीय अधिकारी यांचेविरुध्द सक्त ताकीद दिली असून, वरील आदेशाचे अनुपालन झाले नसल्याने तक्रार क्र.३९, ४० व ४१ दाखल केलेले आहे. यात दि.२९.०८.२०२३, दि.१८.०१.२०२४ रोजी सविस्तर अंतरिम आदेश पारित करण्यात आले असून, उपरोक्त प्रकरणी प्राधिकरणाचे वतीने आज खुलासा सादर करण्यात आलेला आहे. त्यात विद्यमान शिक्षणाधिकारी (माध्य.) यांनी तत्कालीन जन माहिती अधिकारी श्री.दिनेश तरोळे यांना शास्तीची रक्कम भरण्याविषयी तसेच सूनावणीस हजर राहण्याविषयी व नूकसान भरपाईची रक्कम प्रदान करण्याविषयी या आधिच सूचना दिल्या असून, त्यानूषंगाने



राज्य माहिती आयोग खंडपीठ अमरावती

श्री.तरोळे यांनी शास्तीची रक्कम ही शासन खात्यात भरणा केलेली आहे. यातील केवळ रु.१०००/- नूकसान भरपाईची रक्कम अद्यापही प्रलंबित असून, ती पूढील २ आठवड्याच्या आत तक्रारकर्त्यास प्रदान करण्याच्या सूचनेसह प्रस्तुत तक्रार अर्ज निकाली काढून नस्तीबध्द करण्यात येत आहे.

**आदेश**

**उपरोक्त आदेशाचे अधिन राहून प्रस्तुत तक्रार अर्ज निकाली काढून नस्तीबध्द करण्यात येत आहे.**

(राहुल भा.पांडे)
राज्य माहिती आयुक्त
खंडपीठ अमरावती

ठिकाण : अमरावती
दिनांक : २२.०८.२०२४
जावक क्रमांक ७३७७ दिनांक 30 OCT 2024

राज्य माहिती आयोग, खंडपीठ अमरावती

30 OCT 2024

Vishal D.Ingale-२०२४/